


दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com
RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे | अंक : २५३ वा | मंगळवार दि ०९ डिसेंबर २०२५ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

## महाभ्रष्टाचारी टेकाळेंवर एसीबीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची एव्हढी मेहेरनजर कशासाठी?


# अवैध संपत्तीचे शेकडो पुरावे देऊनही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अद्यापही ढिम्मच

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्याच्या महसूल विभागातील भ्रष्टाचाराचे शिरोमणी आणि अत्यंत बेशरम होऊन भ्रष्टाचार करणारे बहुचर्चित तत्कालीन मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांच्या शेकडो कोटी रुपयांच्या अवैध संपत्तीची पुराव्यांनिशी सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे देण्यात आलेली आहे. मात्र,अनेक महिने उलटूनही एसीबीच्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणी फारशी काही कारवाई केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे महाभ्रष्टाचारी टेकाळे यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून एव्हढी मेहेर-नजर कशासाठी दाखवली जात आहे,असा प्रश्न उपस्थित होत आहे. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने आता एसीबीच्या अधिकाऱ्यांना कारवाईसाठी पुन्हा एकदा स्मरमणपत्र देण्यात आलेले आहे.महसूल विभागात वर्षानुवर्षे काम करीत असताना तत्कालीन मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे नामक महानालायक अधिकाऱ्याने महसूल विभागाला भ्रष्टाचाराची गटारगंगा करून टाकले आहे.पदोपदी भ्रष्टाचार करणाऱ्या टेकाळे यांच्या भ्रष्टाचाराविषयी लिहायचे झाले, तर एखादे पुस्तक देखील कमी पडू शकेल. महसूल विभागात अत्यंत बेबंदपणे भ्रष्टाचार करणारे विजय टेकाळे हे राज्याच्या महसूल विभागात अत्यंत दुर्मिळ व्यक्ती आहेत. एकीकडे भ्रष्टाचार करायचा, त्यातून जनसामान्यांची लुबाडणूक करायची, भ्रष्टाचाराच्या पैशातून प्रचंड अशी अपसंपदा गोळा करायची,स्वतःच्या नावे,पत्नीच्या नावे व जवळच्या नातेवाईकांच्या नावे शेकडो सातबारे करून घ्यायचे, वरिष्ठ अधिकाऱ्यांना ब्लॅकमेल करायचे, अधिकाऱ्यांना आपल्या भ्रष्टाचारात सामिल करून घ्यायचे आणि त्यानंतर राजकीय पातळीवर लोकप्रतिनिधींशी संधान साधून स्वतःची कातडी वाचवून घ्यायची, हे प्रकार टेकाळे यांनी केलेले आहेत. टेकाळेंवर कारवाई करण्याबाबत महसूल विभागाचे वरिष्ठ

**तत्कालीन मंडळ अधिकारी विजय टेकाळे यांचा डोंगर खंडाळा येथील तारे यांची सामूहिक न्यायप्रविष्ठ,बँक कर्ज व इतर प्रकरण सुरू असलेली त्या शेतीची नियमबाह्य कागदपत्रे? देऊन करोडो रुपये बाजार मूल्य असलेली शेती छत्रपती संभाजी नगर येथील कंत्राटदार महेंद्र राऊत यांना खरेदीसाठी खोटे दस्तावेज देऊन मदत केल्याचा आरोप तारे यांनी केला आहे.**

अधिकारी अत्यंत लाचार दिसून येत आहेत.ना जिल्हाधिकारी, ना अपर जिल्हाधिकारी, ना निवासी उपजिल्हाधिकारी, ना उपविभागीय अधिकारी कोणीही अधिकारी आज टेकाळेंवर कायदेशीर कारवाई करण्यास धजावत नाहीएत. यावरून टेकाळेंची दहशत अधिकाऱ्यांवर किती आहे, हे स्पष्टपणे दिसून येते. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज ने सर्वप्रथम टेकाळेंचा भ्रष्टाचार जनतेसमोर उघडा-नागडा केलेला आहे. टेकाळेंचे भ्रष्टाचाराचे साम्राज्य जनतेसमोर उघडे पाडण्याचे महत्कार्य दैनिक जनसंचलन ने केले आहे. यानंतरही अधिकारी कारवाई करीत नाहीत,म्हणून टेकाळेंच्या बेकायदेशीर अपसंपदेचे स्वतःच पुरावे गोळा करून ते पुरावे दि. ६ फेब्रुवारी २०२३ रोजी तसेच २९ एप्रिल २०२४ रोजी बुलढाणा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. खरे तर टेकाळेंच्या भ्रष्टाचाराची माहिती ही एसीबीच्या अधिकाऱ्यांना नसेल, असे समजणेच अज्ञानीपणाचे आहे. परंतु सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनकडून शेकडो पुरावे दिल्यानंतर एसीबीच्या अधिकाऱ्यांनी केवळ कागदी घोडे नाचवण्याचे काम केले आहे.परंतु म्हणावी तशी ठोस अशी फौजदारी कारवाई करण्यात एसीबीच्या वतीने कुचराई करण्यात येत आहे. त्यामुळे मस्तवाल झालेले उर्मट टेकाळे हे आजही बेशरमपणे उजळ माथ्याने फिरताना दिसून येत आहेत.टेकाळे हे बेशरम तर आहेतच परंतु त्यांच्यावर कारवाई न करणारे महसुलचे वरिष्ठ




अधिकारी देखील गेंड्याची कातडे पांघरून बसल्याचे दिसून येत आहे.पोलीस प्रशासनात तक्रार करूनही आणि शेकडो पुरावे देऊनही एसीबीचे अधिकारी कारवाई करीत नसल्यामुळे दैनिक जनसंचलनच्या वतीने पुन्हा एकदा कारवाईसाठी एक लेखी स्मरणपत्र लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. यामध्ये टेकाळे यांच्या बेनामी संपत्तीची खुली चौकशी करून ती अवैध संपत्ती शासन दप्तरी जमा करण्याची मागणी करण्यात आली आहे. आता तरी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी जागे व्हा-वे आणि महसूल विभागातील ही भ्रष्टाचाराची कीड काढण्यासाठी पुढाकार घ्यावा.असे झाल्यास दिसून येईल की हे सर्वसामान्यांचे राज्य आहे.अन्यथा हे राज्य भ्रष्टाचाऱ्यांचे आणि भ्रष्टाचाऱ्यांना पाठीशी घालणाऱ्यांचे आहे,असे दुर्दैवाने म्हणावे लागेल. काहीही असले तरी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज मात्र याविरोधात ठामपणे लढत राहणार आहे. जोपर्यंत टेकाळेंसारख्या भ्रष्टाचारी अपप्रवृत्ती महसूल विभागातून जात नाहीत, तोपर्यंत हा संघर्ष अविरत सुरूच राहील.

# बुलढाण्यात पोलिसांचा मेगा सर्च! गुटखादारू विक्रेत्यांची धांदल; ३८ जण रिमांडवर

## बुलढाणा स्वच्छ करण्याची मोठी मोहीम!

**जनसंचलन/ बुलढाणा**

शहरात अवैध गुटखा, तंबाखूजन्य पदार्थ व दारू विक्री करणाऱ्यांविरुद्ध आज (दि. ८ डिसेंबर २०२५) पोलिसांनी मोठी मोहीम राबवत धडाकेबाज कारवाई केली. मा. पोलिस अधीक्षक निलेश तांबे, अपर पोलिस अधीक्षक बुलढाणा यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपविभागीय पोलिस अधिकारी सुधीर पाटील यांच्या उपस्थितीत बुलढाणा शहर व ग्रामीण पोलीस ठाण्याचे अधिकारी, कर्मचारी आणि आरसीपी पथकांच्या पाच विशेष टीम यासाठी तयार करण्यात आल्या. शहरातील विविध भागांत अचानक धाडी टाकून पानटपरी, दुकाने आणि संशयित ठिकाणी तपासणी करण्यात आली. यात अवैधरीत्या गुटखा, तंबाखूजन्य पदार्थ आणि दारू विक्री करणाऱ्या ३३ गुटखा विक्रेत्यांवर व ५ दारू विक्रेत्यांवर असा एकूण ३८ जणांवर कारवाई करण्यात आली. सर्वांना मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे. पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की तंबाखूचे सेवन टाळावे आणि कुठेही अवैध विक्री होत असल्याचे आढळल्यास त्वरित पोलिसांना कळवावे. शहरातील



अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी अशा कारवाया सुरूच राहणार असल्याची माहिती ही पोलिसांनी दिली.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन



# नवा अभ्यासक्रम, जुनीच आव्हाने



राज्यातील शाळांमध्ये पहिलीपासून हिंदी भाषा शिकविण्याचे वादग्रस्त धोरण रद्द करून याबाबत डॉ. नरेंद्र जाधव यांची समिती नेमल्यानंतरही याबाबत अधून मधून राजकीय वक्तव्ये होत असल्याने हा विषय पुरता थांबलेला नाही. मात्र, तिसरी ते दहावी या इयत्तांसाठी जाहीर करण्यात आलेल्या मसुद्यात तिसऱ्या भाषेचा उल्लेख नसल्याने तो आता थांबायला हरकत नाही. हिंदीच्या सक्तीवरून शैक्षणिकच नव्हे, तर राजकीय वातावरणही ढवळले होते; त्यामुळे हा मुद्दा या मसुद्यात नसणे स्वाभाविक म्हणायला हवे. डॉ. जाधव यांच्या समितीच्या शिफारशी येईपर्यंत आणि त्यावर सरकारचा निर्णय होईपर्यंत याबाबत विद्यमान पद्धत कायम ठेवण्याचे धोरण रास्त आहे. ङ्गएनईपीफच्या मसुद्यातील भाषा, त्यातील शिक्षणविषयक चिंतन आणि काळानुरूप विद्यार्थी घडविण्याबाबतची कळकळ यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यासारखे काहीही नाही. राज्यघटनेची आणि शिक्षण हक्क कायद्याची चौकट न मोडता सर्वांपर्यंत दर्जेदार शिक्षण नेणे हे खरे आव्हान आहे. अभ्यासक्रम नवीन येणार असला, तरी हे आव्हान जुनेच आहे. त्यामुळे ङ्गएनईपीफ्त असलेल्या दोषांवर, विशेषत: शाळा संकुलांसारख्या किंवा भारतीय ज्ञानपरंपरेच्या नावाखाली काहीही शिकविण्यासारख्या मुद्द्यावर आणि एकूण देशांतर्गत उत्पन्नाच्या सहा टक्के रक्कम शिक्षणाला देण्यासाठी कटिबद्धता न दाखविण्यावर जाणकार बोट ठेवत आले आहेत. हे दोष दूर करून ङ्गएनईपीफ कशा पद्धतीने राबविले जाते, हे महत्त्वाचे आहे. प्रस्तावित अभ्यासक्रम मसुद्यात सहावीपासून व्यावसायिक शिक्षण हा विषय स्वतंत्रपणे येईल. विद्यार्थ्यांना ज्ञानाबरोबरच विविध व्यवसायांचे आणि कौशल्यांचे शिक्षण देण्याबाबत दुमत असण्याचा प्रश्नच नाही. यापूर्वीच्या विविध शैक्षणिक धोरणांत हा मुद्दा येऊन गेला आहे. शालेय शिक्षणातही कार्यानुभवाचा समावेश पूर्वीपासून आहे. मात्र, दुर्दैवाने आपल्याकडे शालेय स्तरावर अशा विषयांना फारसे महत्त्व दिले जात नाही. आपली मुले ही भाषा, गणित, विज्ञान, समाजविज्ञान विषयांत प्रवीण व्हावीत, अशी बहुतेक पालकांची अपेक्षा असते. कार्यानुभव किंवा व्यावसायिक शिक्षण यांबाबत ते उदासीन असतात. म्हणून अनेक शाळांमध्ये या विषयांचे शिक्षण केवळ कागदोपत्री होते; त्यांच्यासाठीच्या तासिका गणित किंवा अन्य विषयांसाठी वापरल्या जातात, असाही अनुभव आहे. त्यामुळे आता नव्याने सहावीपासून व्यावसायिक शिक्षणाचा समावेश केला गेला असला, तरी त्याच्या अंतिम फलनिष्पत्तीबाबत साशंकता आहे. हे विषय केवळ कागदोपत्री न राहता, प्रत्यक्षात घेतले जावेत, त्यांसाठीची प्रात्यक्षिके होतील आणि विद्यार्थ्यांना अनुभवातून शिकता येईल असे वातावरण निर्माण व्हायला हवे. यांबाबत शिक्षकांची आणि पालकांचीही मानसिकता बदलायला हवी. तरच व्यावसायिक शिक्षण परिणामकारक होईल; अन्यथा ते कुचकामी ठरेल. भारतीय ज्ञानप्रणाली, मूल्ये आणि स्वभाववृत्ती यांचा उल्लेख मसुद्यात असून, त्यांचा एकात्मिक स्वरूपात विचार करण्यात आला आहे. भारतीय ज्ञानपरंपरांच्या शिक्षणाबाबत घेतले जात असलेले आक्षेप दूर केल्यास आणि हा विषयही वेळापत्रकानुसार शिकविल्यास उपयुक्त ठरेल. तिसरी ते पाचवी या इयत्तांसाठीचा ङ्गपरिसर अभ्यासफ हा प्रामुख्याने विज्ञान, इतिहास आणि भूगोल यांच्याशी संबंधित विषय आता ङ्गआपल्या सभोवतालचे जगफ या नावाने शिकविला जाईल. हा केवळ नावातील बदल राहणार नाही, हे पहावे लागेल. जिल्हा, राज्य आणि देश या क्रमाने इतिहासाचे शिक्षण असेल हे सांगताना चौथीसाठी सध्या असलेले ङ्गशिवछत्रपतीफ हे पाठ्यपुस्तक आहे तसे चालू ठेवण्याची भूमिका रास्तच म्हणावी लागेल. नववी आणि दहावी या इयत्तांसाठी अनुक्रमे समाजातील व्यक्ती आणि पर्यावरण शिक्षण हे पाठ्यक्रम स्वतंत्रपणे तयार करण्यात आले आहेत. संरक्षणशास्त्र, समाजसेवा, वाहतूक सुरक्षा आणि संरक्षण अशा अन्य विषयांचा उल्लेखही आहे. हे सर्व विषय महत्त्वाचे असले, तरी योग्य प्रमाणात आणि परिणामकारतेने ते शिकवायला हवेत. या मसुद्यावर येणाऱ्या सूचनांचा स्वीकार करून, आवश्यक ते बदल करून अभ्यासक्रम प्रत्यक्षात येईल, हे पाहायला हवे.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# मंत्रिमंडळ बैठकीत महाराष्ट्रासाठी २ मोठे निर्णय, मिलिंद साठे राज्याचे नवे महाधिवक्ता

**नागपूर :** विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला सोमवारपासून (८ डिसेंबर) सुरुवात होणार आहे. हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सरकारचा आज चहापानाचा कार्यक्रम पार पडला. या चहापानाच्या कार्यक्रमावर विरोधकांनी बहिष्कार टाकला. विरोधकांनी पत्रकार परिषद घेत अधिवेशनात पूरग्रस्त शेतकऱ्यांना मदत, शेतकरी कर्जमाफीसह विरोधी पक्षनेता पद निवडीबाबतच्या मुद्द्यावरुन सरकारला घेरणार असल्याचा इशारा दिला. त्यानंतर राज्य सरकारचा चहापानाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमानंतर राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या बैठकीत महाराष्ट्रासाठी दोन महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यापैकी एक महत्त्वाचा निर्णय म्हणजे राज्याच्या नवे महाधिवक्तांची निवड करण्यात आली आहे. तर दुसरा निर्णय हा शेतकऱ्यांसाठी घेण्यात आला आहे. राज्याचे महाधिवक्ता म्हणून मिलिंद साठे यांची निवड करण्यात आली आहे. वीरेंद्र सराफ यांनी काही महिन्यांपूर्वी महाधिवक्ता पदाचा राजीनामा दिल्याची माहिती समोर आली होती. पण महाधिवक्तापदी नव्या



विधीतज्ज्ञांची निवड होत नाही तोपर्यंत काही महिने त्यांना जबाबदारी सांभाळण्याची विनंती सरकारकडून करण्यात आली होती. त्यानुसार वीरेंद्र सराफ हे महाधिवक्ता पदाची जबाबदारी पार पाडत होते.दरम्यान, हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला नागपुरात आज पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत याबाबत निर्णय घेण्यात आला. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मिलिंद साठे यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आलं. मिलिंद साठे यांचा विधी विभागात दांडगा अनुभव आहे. त्यामुळे राज्याला त्यांच्या अनुभवाचा चांगला फायदा होईल अशी भावना व्यक्त होत आहे.मुंबई उच्च न्यायालयातील प्रख्यात वरिष्ठ वकील म्हणून ओळख असलेले डॉ. मिलिंद साठे हे कायद्यावरील सखोल अभ्यास, कायदेशीर प्रक्रियेवरील प्रभुत्व यासाठी ओळखले जातात. याखेरीज त्यांनी मुंबई हायकोर्ट असोसिएशनचे अध्यक्ष म्हणूनही काम केले आहे. त्यांना विज्ञान, कला, वित्त व व्यवस्थापन या विविध क्षेत्रांतील ज्ञान असल्याने त्यांची विविध विषयांची कायदेशीर मांडणी अधिक व्यापक असल्याचे सांगितले जाते. जानेवारी २०२४ मध्ये कसबा पेठ मतदारसंघातील निधी गैरवापराच्या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने त्यांची न्यायालय मित्र म्हणून नियुक्ती केली होती. तसेच, विविध महत्त्वाच्या प्रकरणांत त्यांच्या तर्कशुद्ध व अभ्यासपूर्ण मांडणीची दखल न्यायमूर्तींसहित कायदेक्षेत्रात घेतली गेली आहे.

## 'विरोधक दिशाहीन' चहापान बहिष्कारावर फडणवीसांची टीका

**नागपूरे :** नागपुरात सोमवारपासून सुरू होणाऱ्या हिवाळी अधिवेशनाआधीच राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. अधिवेशनाच्या पारंपरिक सुरुवातीचा भाग मानला जाणारा ङ्गसरकारचा चहापान कार्यक्रम यंदा विरोधकांनी बहिष्कृत केला असून त्यामुळे सत्ताधाऱ्यांविरोधात असंतोष अधिक उफाळून आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या रामगिरी निवासस्थानी आयोजित चहापान कार्यक्रमाला जाणे विरोधकांनी नाकारले.त्यानंतर आता यावर मुख्यमंत्र्यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. हिवाळी अधिवेशनाआधी महायुती सरकारची पत्रकार परिषद पार पडली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी ते म्हणाले की, विरोधी पक्षाने चहापानावर बहिष्कार टाकण्याची परंपरा पाळली आहे. विरोधकांची पत्रकार परिषद ही निरोशेने भरलेली होती. विरोधकांचा त्रागा या पत्रकार परिषदेत पाहायला मिळाला, असं फडणवीस म्हणाले आहेतविरोधी पक्षनेता कोण असावा, याचा निर्णय सभापती आणि



अध्यक्ष यांच्याच अधिकारात येतो. ते जो निर्णय घेतील, तो आम्हाला मान्य असेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.सध्या विरोधक दिशाहीन झाले असून, त्यांच्या हातात कोणतेही ठोस मुद्दे नाहीत, असा आरोपही फडणवीसांनी यावेळी केला आहे. हे अधिवेशन सुरळीत पार पडेल आणि विरोधकांच्या सर्व प्रश्नांना योग्य उत्तरे देऊ, असा विश्वास त्यांनी व्यक्त केलाविजय वडेट्टीवार यांनी आताचा विदर्भ व आताची गडचिरोली बघावी. काय बदल घडले, विकास किती झाला हे बघावं', असे सीएम फडणवीस म्हणाले आहेत.विदर्भासाठी फडणवीस काही करत नाहीत, अशी टीका वडेट्टीवार यांनी केली होती.

## शेवटी बाप तो बापच असतो', रविंद्र उदय सामंत यांच्याकडून शिंदेंचं कौतुक

**डोंबिवली :** महाराष्ट्राच्या राजकारणासाठी आज डोंबिवली हे शहर महत्त्वाचं ठरलं. कारण डोंबिवलीत आज विविध विकासकामांचं भूमीपूजन पार पडलं. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार श्रीकांत शिंदे, उद्योगमंत्री उदय सामंत आणि भाजपचे प्रदेशाध्यक्ष तथा डोंबिवलीचे आमदार रविंद्र चव्हाण उपस्थित होते. या कार्यक्रमात श्रीकांत शिंदे यांनी रविंद्र चव्हाण यांच्यासमोर शेरोशायरी केली. तर उदय सामंत यांनी आपल्या भाषणात रविंद्र चव्हाण यांच्यासम ोर 'शेवटी बाप तो बापच असतो', असं म्हणत एकनाथ शिंदे यांचं कौतुक केलं. त्यांच्या भाषणाची सध्या राजकीय वर्तुळात चांगली चर्चा होत आहे. तसेच एकनाथ शिंदे आणि रविंद्र चव्हाण या दोन्ही नेत्यांमध्ये संभाषण होत असताना शिंदेंची देहबोलीवरुनही राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे.मी धाडसाने



सांगतो, शेवटी बाप तो बापच असतो. एकनाथ शिंदे यांनी अडीच वर्षात जी कामे केली, आमच्या मतदारसंघातदेखील, तशी कामे आमच्या कारकीर्दीत कधी बघितली नव्हती. तुम्ही तुमच्या स्किलवर आणि ताकदीवर ही विकासकामे आणली. पण महायुतीच्या प्रत्येक आमदाराला स्वत:च्या ताकदीवर राजकीय उभं करण्याचं काम जर कुणी केलं असेल तर ते देखील एकनाथ शिंदे यांनी केलं असेल', असं मोठं वक्तव्य मंत्री उदय सामंत यांनी केलं.माझ्या मतदारसंघामध्ये एकनाथ शिंदे आले होते. तिथे आमच्या बुथप्रमुखांचा एक मेळावा होता. मी एकनाथ शिंदे यांना सांगितलं की, लोकार्पणाचा सोहळा आहे तेवढा करुया. शिंदे पाच मिनिटांसाठी तिथे आले. आम्ही लोकार्पण सोहळा केला. शिंदेंनी विचारलं हे पैसे कुठून आणले? मी सांगितलं की, साहेब घाईघाईत तुमची सही घेतली होती, त्यातून पैसे मिळाले. जवळपास २५ कोटी रुपयांची वास्तू आम्ही तयार केली.

तारांगण तयार केलं. अरबी समुद्राच्या बाजूला शिवसृष्टी तयार केली. हे सर्व श्रेय एकनाथ शिंदे यांचं आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले नसते तर कोकणाचा हा विकास आम्ही बघू शकले नसतो ही वस्तुस्थिती आहे', असादेखील मोठा दावा उदय सामंत यांनी केला.एकनाथ शिंदे यांनी विकासकामाला कधी निधी कमी पडू दिलेला नाही. आता भाजप नेते रविंद्र चव्हाण यांनी जीमखान्याची मागणी केलेली आहे.

## चहापानाच्या कार्यक्रमावर विरोधी पक्षांचा बहिष्कार, अधिवेशनाआधी मोठी बातमी

**नागपूर :** राज्य विधी मंडळाचं हिवाळी अधिवेशन उद्यापासून सुरु होणार आहे. अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सरकारकडून आज रविवारी चहापानाच्या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. राज्य सरकारकडून विरोधी पक्षांनादेखील या चहापानाच्या कार्यक्रमाचं निमंत्रण देण्यात आलं होतं. पण विरोधी पक्षाच्या नेत्यांनी चहापानाच्या कार्यक्रमावर नेहमीप्रमाणे बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आक्रमक नेते भास्कर जाधव यांच्यासह इतर नेत्यांनी आज महाविकास आघाडीच्या वतीने संयुक्त पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी



सरकारने आयोजित केलेल्या चहापानाच्या कार्यक्रमावर विरोधकांकडून का बहिष्कार टाकत आहोत? याबाबत सविस्तर भूमिका मांडली आहे.आम्ही चहापानाच्या कार्यक्रमाला का जात नाही आहोत? याबाबत विजय वडेट्टीवार यांनी सविस्तर विश्लेषण केलेलं आहे. आम्हाला राज्याचे प्रमुख म्हणून सभागृह नेते म्हणून तसेच राज्याचे देवेंद्र फडणवीस यांनी आम्हाला चहापानाला या म्हणून पत्र पाठवलं आहे. त्या पत्रात मुख्यमंत्र्यांनी भास्करराव जाधव आमदार असं लिहिलं आहे. त्यापुढे लिहिलं आहे की, आपल्या महाराष्ट्राला खूप मोठी गौरवशाली परंपरा लाभलेली आहे. आता ते कुठल्या अधिकारात पत्र पाठवतात? तर ते राज्याचे प्रमुख म्हणून आम्हाला पत्र पाठवतात. तशाच पद्धतीने विरोधी पक्षाचा प्रमुख कोण आहे?', असा सवाल भास्कर जाधव यांनी केला. दोन्ही सभागृहांना विरोधी पक्षनेता नाही आणि आम्ही विरोधी पक्षांना चहापानाला बोलवलं आहे असं सांगायचं, पण विरोधी पक्षनेता पदाची दोन्ही पदं खाली ठेवायची. पर्यायाने ही पदं केवळ शासन निर्णयात किंवा पर्यायाने पुढे आलेली नाहीत. तर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जी घटना आहे त्या घटनेमध्ये विरोधी पक्षनेता असलाच पाहिजे, त्याच्या निवडीची पद्धत नियमात सुद्धा आहे.

तथा परंपरेमध्ये सुद्धा आहे', असा दावा भास्कर जाधव यांनी केला.एकूण सदस्यसंख्येच्या १० टक्के सदस्यसंख्या असल्याशिवाय विरोधी पक्षनेता निवडता येत नाही, असं सांगितलं जायचं. पण हे साफ खोटं आहे. याचे सगळे पुरावे आम्ही विधीमंडळाला दिले. सचिव आणि अध्यक्षांना दिले. आम्ही त्यांच्याकडून विरोधी पक्षनेताचे नियम आणि कायदेशीर प्रक्रिया काय आहे हे लिखीत स्वरुपात मागितली. त्यानंतर अखेर प्रधान सचिवांना पत्र द्यावं लागलं', अशी माहिती भास्कर जाधव यांनी दिली.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# माझी वर्दी द्या, घरी जायचंय; पोलिस अधिकाऱ्याने जीव दिला, महिला शिपायाशी जवळीक अनब..

**कानपूर :** उत्तर प्रदेशातील कानपूरच्या जालौन कोंच पोलिस स्टेशनच्या अधिकाऱ्याने आपल्या आयुष्याची अखेर केली. त्यांनी स्वत:वर गोळी झाडून आपला जीव दिल्याची माहिती आहे. या प्रकरणात आता नवीन खुलासे समोर येत आहेत. अरुण कुमार राय असं जीव देणाऱ्या पोलिसाचं नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पोलिस अधिकाऱ्याची एका महिला कॉन्स्टेबलसोबत जवळीक वाढली होती. सहकारी पोलिस अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, महिला कॉन्स्टेबलने स्टेशन इन्चार्जचे काही व्हिडिओ आणि चॅट्स सेव्ह करुन ठेवले होते, ते वापरून ती त्यांना सतत त्रास देत होते.आता याप्रकरणी या महिला कॉन्स्टेबलला अटक करण्यात आली आहे. तसेच, तिच्या मोबाइलचाही तपास सुरु आहे. ज्यामध्ये पोलिसांना काही मेसेज सापडले आहेत.अरुण कुमार राय यांच्या मृत्यू प्रकरणात महिला कॉन्स्टेबल मीनाक्षी शर्माला ताब्यात घेण्यात आले आहे आणि त्यांच्या पत्नीने दिलेल्या लेखी तक्रारीवरून तिची चौकशी केली जात आहे. सूत्रांनुसार, मीनाक्षी आणि अरुण यांच्यात जवळचे संबंध होते. महिला कॉन्स्टेबलशी ही वाढती जवळीक त्यांच्या मृत्यूचे कारण असू शकते, असा संशय आहे.याप्रकरणी मिळालेल्या अधिक माहितीनुसार, १४ मार्च २०२४ रोजी महिला कॉन्स्टेबल मीनाक्षी शर्मा यांची कोंच पोलिस ठाण्यात नियुक्ती झाली होती. ५ जुलै २०२४ ला अरुण कुमार राय यांनी कोंच पोलिस ठाण्याचे इन्स्पेक्टर इनचार्ज म्हणून पदभार स्विकारला. दोघेही सुमारे सात महिने एकाच पोलिस ठाण्यात एकत्र तैनात होते. या काळात, त्यांच्यातील जवळीक वाढल्याच्या अफवा तीव्र झाल्या. २२ फेब्रुवारी २०२५ ला अरुण यांची




ओराई पोलिस ठाण्यात बदली करण्यात आली, तर मीनाक्षीला २८ एप्रिल २०२५ रोजी यूपी ११२ युनिट-१५७७ येथे पाठवण्यात आले.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अरुण हे ओराईला गेल्यानंतर मीनाक्षीचे वर्तन बदलले. ती अरुण यांच्यावर विविध मुद्द्यांवरून सतत दबाव आणत होती. ती त्यांच्या अधिकृत निवासस्थानी जाऊन वाद घालत असे, ज्यामुळे अरुण तणावात होते. सततचा ताण, संघर्ष आणि दबाव यामुळे अरुण कुमार राय यांच्या मानसिक स्थितीवर मोठा परिणाम झाला, ज्यामुळे त्यांचा मृत्यू झाला, असंही सांगण्यात येत आहे.या खळबळजनक घटनेत, मृत इन्स्पेक्टरची पत्नी माया राय यांनी महिला कॉन्स्टेबल मीनाक्षी शर्मा यांच्याविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिस सूत्रांचे म्हणणे आहे की मीनाक्षीच्या कॉल डिटेल्स आणि चॅट्समुळे अनेक गुपिते उलगडू शकतात. महिला कॉन्स्टेबल आणि स्टेशन इन्चार्ज यांच्यातील मोबाईल फोनवरील संभाषणाची नोंद देखील सापडली आहे. इतकंच नाही तर घटनेच्या काही काळापूर्वी, महिला कॉन्स्टेबलने तिची वर्दी मागण्यासाठी अरुण यांना फोन केला होता, माझी वर्दी द्या, मला घरी जायचे आहे, असं ती म्हणाली होती, अशीही माहिती आहे.

## पत्नीला वाचवलं, तीन मेहुणींना वाचवण्यासाठी पुन्हा आगीत शिरला

**पणजी :** उत्तर गोव्यात गर्दीने तुडुंब भरलेल्या नाइटक्लबला शनिवारी मध्यरात्रीनंतर लागलेल्या भीषण आगीत २५ जणांचा मृत्यू झाला, तर सहा जण जखमी झाले. डान्स फ्लोअरजवळ फोडलेल्या फटाक्यांमुळे ही आग लागल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले असून, नियमांची अंमलबजावणी करण्यात सरकारी अधिकाऱ्यांनी हलगर्जी केल्याचेही समोर आले आहे. या आगीत एका महिलेने पती आणि तिघी बहिणींना गमावले. महिलेचा जीव वाचवून तिचा पती तीन मेहुणींना वाचवण्यासाठी पुन्हा आगीत गेला होता, मात्र दुर्दैवाने त्या चौघांपैकी कोणीही परत येऊ शकलं नाही.गोवा येथे सुट्टीसाठी गेलेल्या दिल्लीतील कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. गाझियाबाद आणि नवी दिल्ली येथील जोशी कुटुंब गोव्यात तीन दिवसांपासून सुट्टीचा आनंद घेत होते. शनिवारी ते 'इळीलह डू ठाशे डरपश' या नाईटक्लबला भेट देण्यासाठी गेले. दुर्दैवाने त्यांनी क्लबमध्ये प्रवेश केल्यानंतर काही मिनिटांतच आग लागली. या आगीत महिलेचे पती विनोद कुमार आणि महिलेच्या तीन बहिणी - अनिता जोशी, सरोज जोशी आणि कमला जोशी अशा चौघांचा दुर्दैवी मृत्यू झालाआग लागल्यानंतर विनोद कुमार यांनी सर्वात आधी आपली पत्नी भावना जोशी यांना मुख्य प्रवेशद्वारातून बाहेर ढकलले. त्या बाहेर पडल्या, पण त्यांचे पती आणि बहिणी आतच अडकले होते. बायकोच्या तिघी बहिणींना वाचवण्यासाठी विनोद कुमार जीवाची पर्वा न करता पुन्हा आगीत शिरले. भावना बाहेर उभ्या राहून आपल्या पतीला वारंवार फोन करत होत्या, पण त्यांचा फोन वाजत राहिला आणि प्रतिसाद मिळाला नाही.



## चिमुकल्यांना घेऊन जंगलात गेला अन संपवल

**लखनौ :** एका व्यक्तीने आपल्या दोन चिमुकल्या मुलांना विष देऊन नंतर आपल्या आयुष्याची अखेर केली आहे. उत्तर प्रदेशातील बिजनौर जिल्ह्यातून एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. या घटनेने परिसरात एकच हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. ही दुःखद घटना शनिवारी चांदपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या मुबारकपूर खादर गावाजवळ घडल्याची माहिती आहे.

येथे २८ वर्षीय बाबुरामने शनिवारी दुपारी आपल्या पाच वर्षांचा मुलगा दीपांशू आणि तीन वर्षांची मुलगी हर्षिका यांना घराबाहेर नेले.तो दोन्ही मुलांना गावाजवळील जंगलात घेऊन गेला. तिथे त्याने त्यांना विष देऊन मारले आणि नंतर स्वतः विष प्राशन केले. या घटनेची माहिती मिळताच गावकऱ्यांनी तिघांनाही तातडीने रुग्णालयात नेले. मात्र, त्यांची तपासणी केल्यानंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. जेव्हा मुलांना रुग्णालयात आणण्यात आलं तेव्हा त्यांची स्थिती पाहून उपस्थितांचे मन हेलावून गेले.

## लातुरात प्लॉटिंगच्या वादात संताप अनावर, तरुणावर धारदार शस्त्राने

**लातूर :** लातूर जिल्ह्यातील गुन्हेगारीचा चेहरा दिवसेंदिवस विकोपाला जात असून, निलंगा शहरात सायंकाळच्या वेळी घडलेल्या एका धक्कादायक घटनेने नागरिकांची झोप उडवली आहे. प्लॉटिंगच्या जमिनीच्या व्यवहारातून सुरू झालेला वाद क्षणात उग्र झाला आणि त्याचे रूपांतर थेट प्राणघातक हल्ल्यात झाले. शहरातील हाडगा नाका परिसरात झालेली ही घटना प्रत्यक्षदर्शींना अक्षरशः हादरवून गेली.उमरगा हाडगा येथील जगदीश लोभे हे हल्ल्यात गंभीर जखमी झाले आहेत. प्रारंभी दोन्ही गटांमध्ये जमिनीच्या मोजमाप, सीमारेषा आणि व्यवहारांवरून वाद सुरू होता. काही मिनिटांतच वादाचा सूर चढला, शिवीगाळ झाली आणि अचानक आरोपीने संतापत धारदार शस्त्र बाहेर काढले. प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, आरोपीने थेट लोभेंच्या मानेवर जोरदार वार केला. वार एवढा खोलवर होता की, रक्ताचा फवारा उडाला आणि लोभे किंचाळत जमिनीवर कोसळले. हा क्षण पाहणारे काही लोक




भीतीने मागे सरकले, तर काहींनी जीव मुठीत धरून मदतीसाठी धाव घेतलीजखमी अवस्थेत असलेल्या जगदीश लोभेंना प्रथम स्थानिक दवाखान्यात नेण्यात आले. पण प्रकृती जास्त बिघडत असल्याने त्यांना तातडीने लातूर येथील खासगी रुग्णालयात हलवण्यात आले. डॉक्टरांनी शस्त्रक्रिया करून जखम टाके घातले असून अद्यापही त्यांच्या प्रकृतीबाबत संभ्रम व्यक्त केला जात आहे. पुढील २४ तास अत्यंत महत्त्वाचे असल्याचे वैद्यकीय सूत्रांनी सांगितले.

## सप्तशृंगीला जाताना एकाच कुटुंबातील सहा जणांचा मृत्यू

**नाशिक :** सप्तशृंगीच्या दर्शनासाठी जाताना सुमारे ७०० फूट खोल दरीत इनोव्हा कार कोसळून सहा भाविक जागीच ठार झाल्याची घटना रविवारी दुपारी साडेचार वाजताच्या सुमारास घडली. मोबाइलच्या टॉर्चमध्ये मृतदेह शोधून बाहेर काढण्याची वेळ आली. नांदुरी ते सप्तशृंग गड घाट रस्त्यातील गणपती मंदिराजवळ अपघात झाला. सर्व भाविक पिंपळगाव बसवंत येथील रहिवासी असून, मृतांमध्ये तीन महिलांचा समावेश आहे. कीर्ती हिंमतलाल पटेल (वय ५५), रशिलाबेन पटेल (५५), विठ्ठल पटेल (६५), लता विठ्ठल पटेल (६०), पचाण पटेल (७०), मणीबेन पटेल (५५) अशी मृतांची नावे आहेत.पटेल कुटुंब त्र्यंबकेश्वरहून दर्शन घेऊन सप्तशृंगीदेवीच्या दर्शनासाठी जाताना इनोव्हा कारच्या (एमएच १५/बीएन ०५५५) चालकाचा गडाजवळील भवरीनाला धबधबा घाट परिसरातील रस्त्यातील एका वळणावर पुढे जाण्याचा प्रयत्न करताना वाहनावरील ताबा सुटला. घाटाच्या कुमकुवत संरक्षक कठड्याला वाहनाची जोरदार धडक बसल्यानंतर वाहन थेट ७०० फूट दरीत कोसळले. सप्तशृंगी देवी ट्रस्टचे आपत्ती व्यवस्थापन व्यवस्थेचे पथक, ग्रामपंचायत यंत्रणा, रोप वे ट्रॉलीचे कर्मचारी पथक, नांदुरी ग्रामपंचायत, वन विभाग प्रशासनासह स्थानिक ग्रामस्थांनी मृतदेह बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले. दोरखंड बांधून आपत्ती व्यवस्थापनाचे पथक दरीत उतरले. मोबाइलच्या टॉर्चमध्ये मृतदेह शोधून बाहेर काढण्यात आले.या वेळी सहा-सात रुग्णवाहिका घाटात दाखल झाल्या होत्या. या वेळी सप्तशृंग गडाचे उपसरपंच संदीप बेनके व सदस्य राजेश गवळी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या गलथान कारभारामुळे ही घटना घडल्याचा आरोप करीत बांधकाम विभागावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी केली आहे.



कीर्ती पटेल यांच्या कुटुंबीयांचे पिंपळगाव बसवंत येथे सॉ मिल, मार्बलचा व्यवसाय आहे. पिंपळगाव शहरातील मनमिळावू व्यक्ती म्हणून ते प्रसिद्ध होते. पटेल यांच्यासह नातेवाईक व त्यांची पत्नी असे सहा जण इनोव्हा कारमध्ये होते. सकाळी ते त्र्यंबकेश्वरला गेले. तेथून ते नाशिकला आले. नाशिकला द्वारका येथे चालक काही कामासाठी उतरला. त्यामुळे पटेल स्वतः कार चालवत दिंडोरीमार्गे सप्तशृंगी गडावर निघाले, तेव्हा वाटेत हा अपघात झाला.

# जिथे वर्ल्ड कप जिंकला तिथेच स्मृतीला मिळाली न भरणारी जखम..

**मुंबई :** स्मृती मानधनाचा अडचणींचा काळ सरता सरत नसल्याचे समोर येत आहे. लग्नाला काही मिनिटं शिल्लक असताना वडिलांना हार्ट अटॅक आला होता. त्यामुळे त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल केलं आणि स्मृतीने त्यानंतर आपलं लग्न पुढं ढकललं होतं. आता रविवारी स्मृती मानधनाने आपलं पलाश मुच्छलबरोबर लग्न होणार नसल्याचं जाहीर केलं आणि या प्रकरणाला पूर्णविराम दिला. पण हे प्रकरण आता संपलं असलं तरी आठवणी काही करू पाठ सोडत नाहीत. हीच गोष्ट आता स्मृतीबाबतही पाहायला मिळू शकते. त्यामुळे ज्या मैदानात तिने वर्ल्ड कप उंचावला, तिथेच तिला आता न भरणारी जखम मिळाली असल्याचे म्हटले जात आहे.स्मृती वर्ल्ड कपमध्ये भन्नाट





फॉर्मात होती. सातत्याने धावा करत स्मृती भारताला चांगली सुरुवात करून देत होती. भारताने जो वर्ल्ड कप जिंकला, त्यामध्ये स्मृतीचा मोलाचा वाटा होता. भारताने फायनलमध्ये दमदार विजय साकारला. भारतीय खेळाडूंनी जोरदार सेलिब्रेशन केलं. हरमनप्रीत कौरने जय शहा यांच्या हातून वर्ल्ड कप स्विकारला आणि त्यानंतर भारतीय संघाची उप कर्णधार असलेल्या स्मृती मानधनाच्या हातात वर्ल्ड कप स्थिरावला. आनंदात असलेल्या स्मृतीने वर्ल्ड कप उंचावला, ही आठवण स्मृतीला आठवेल. पण त्याच मैदानातील अजून एक घडलेली गोष्ट स्मृतीसाठी वाईट ठरू शकते.नवी मुंबईतील डी. वाय. पाटील मैदानात स्मृतीने वर्ल्ड कप उंचावला होता. त्यानंतर याच मैदानात स्मृतीने पाऊल ठेवलं होतं, ते एका खास कारणासाठी. कारण पलाश मुच्छल स्मृतीला याच मैदानात डोळे बंद करून घेऊन आला होता. स्मृतीला पलाशने खेळपट्टीवर जवळ नेलं होतं आणि तिथे त्याने स्मृतीला प्रपोज केलं होतं. सारं कारी स्वप्नवत असंच सुरु होतं. त्यानंतर साखरपुडा झाला, स्मृतीचा व्हिडिओ व्हायरल झाला. हळद लागली, संगीत सोहळा पार पडला अनब त्यानंतर वडिलांना हार्ट अटॅक आल्यामुळे लग्न पुढे ढकललं, ते आता होऊ शकणार नाही. स्मृती पलाशबाबतच्या आठवणी विसरण्याचा नक्कीच प्रयत्न करेल. पण जेव्हा स्मृती या मैदानात उतरेल, तेव्हा तिला आपल्याला पलाशने केलेल्या प्रपोजची आठवण आल्यावाचून राहणार नाही. त्यामुळे ही आठवण स्मृतीसाठी न भरणारी जखम ठरू शकते. पण स्मृती या सर्व गोष्टींचा कसा सामना करते आणि किती सकारात्मकपणे पुढे जाते, हे सर्वात महत्वाचे असणार आहे. स्मृती पुढचे ध्येय भारताला ट्रॉफी जिंकवून देण्याचे असेल, असे स्मृतीने म्हटले आहे.

## देशाला मॅच जिंकवली, मालिकावीर ठरला अनब विराट कोहली त्यानंतर कुठे गेला..

**नवी दिल्ली :** विराट कोहली सध्याच्या घडीला भन्नाट फॉर्मात आहे. दक्षिण आफ्रिकेच्या वनडे मालिकेत तर त्याने दोन शतकं झळकावली आणि अखेरच्या सामन्यात नाबाद अर्धशतकी खेळी साकारली. या मालिकेत सर्वाधिक धावा या विराट कोहलीच्या नावावर होत्या. त्यामुळेच विराट कोहलीला मालिकावीर पुरस्कार देण्यात आला. विराट कोहलीने देशाला सामने जिंकवले आणि त्यानंतर तो नेमका कुठे पोहोचला, हे आता समोर आलं आहे. कारण एका व्हिडिओमुळे विराट नेमका कुठे गेला हे आता समजले आहे.विराट कोहलीवर गौतम गंभीर यांनी टांगती तलवार ठेवली होती. ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यात त्याला लौकिकाला साजेशी कामगिरी करता आली नव्हती. त्यामुळे विराट कोहलीला गंभीर वनडे संघात ठेवणार की नाही, अशा चर्चा सुरु झाल्या होत्या. पण विराटला या मालिकेत संधी मिळाली आणि त्याने या संधीचे सोने केले. कारण या मालिकेत फक्त विराट आणि विराटच पाहायला मिळाला. पहिल्या सामन्यात विराट हा एकमेव शतक करणारा फलंदाज ठरला, दुसऱ्या सामन्यात भारताकडून विराट आणि ऋतुराज गायकवाड यांनी शतक झळकावले, तर तिसऱ्या सामन्यातही विराटने नाबाद अर्धशतकी खेळी साकारली. त्यामुळे विराट कोहलीची जगभरात चर्चा आहे. पण सामना संपल्यावर विराट कोहली कुठे गायब झाला, अशी चर्चा होती. पण विराट कोहली एका खास ठिकाणी गेल्याचे पाहायला मिळाले.भारताचा



हा सामना विशाखापट्टणम येथे झाला होता, सामना संपला आणि विराट कोहली लगेच दुसऱ्या दिवशी एका खास मंदीरात गेला. या मंदीराचे नाव आहे वराह लक्ष्मी नरसिंहा सिम्हाचलम. विराट कोहली या मंदारीता गेल्यावर काही विधी केल्या, विराट यावेळी शांतचित्ताने बसलेला होता. विशाखापट्टणम येथील हे मंदीर प्रसिद्ध आहे. त्यामुळे विराट कोहलीने काही जवळच्या व्यक्तींबरोबर या मंदीराला भेट दिल्याचे पाहायला मिळाले आणि त्याचे व्हिडिओ आता जोरदार व्हायरल होत आहेत.विराट कोहली काही दिवसांपासून धार्मिक झाल्याचे पाहायला मिळत आहे. काही दिवसांपूर्वी विराट हा प्रेमानंद महाराजांच्या आश्रमात गेला होता. त्यानंतर विराट आता या खास मंदीरात गेल्याचे पाहायला मिळाले.

## आयपीएलच्या सर्वात मोठ्या ट्रेड डील मागे एम.एस.धोनीचा हात?

**मुंबई :** आयपीएल रिटेन्शन काल पार पडलं. अनेक संघानी मोठे मोठे धक्कादायक निर्णय घेतलेले पाहायला मिळाले. सर्वात मोठी ट्रेड डील ही राजस्थान रॉयल्स आणि चेन्नई सुपर किंग्ज यांच्यात रंगली. राजस्थानने संजू सॅमसनला सोडण्याचा निर्णय घेतला. तर चेन्नईने संजूला संघात सामील केले आणि या बदल्यात ठरींळपवीर गरवशक्षर अपव डरा उींीशप राजस्थानला दिले. आता जडेजा राजस्थानकडे जाण्यामागे महेंद्र सिंग धोनीचा हात असल्याचे म्हटले जात आहे.रवींद्र जडेजाच्या सीएसके सोडण्याने राजस्थान रॉयल्समध्ये जाण्यापेक्षा जास्त चर्चा निर्माण झाली आहे. राजस्थान रॉयल्सने संजू सॅमसनला सीएसकेमध्ये आणण्याच्या बदल्यात रवींद्र जडेजा आणि सॅम करनचा समावेश त्यांच्या संघात केला. १२ वर्षांनंतर जडेजाने सीएसके सोडण्यास कसे सहमती दर्शविली हा देखील चर्चेचा विषय आहे. जडेजाला संघ सोडण्यास भाग पाडले गेले




का असा प्रश्न निर्माण होत आहे. आता, एका मीडिया रिपोर्टमध्ये असे उघड झाले आहे की एमएस धोनी आणि रवींद्र जडेजा यांनी व्यापार करार अंतिम होण्यापूर्वी उघडपणे चर्चा केली.क्रिकबझच्या मते, व्यापार करार सुरू होण्यापूर्वीच जडेजा आणि धोनी यांनी उघडपणे चर्चा केली. जडेजाचे सीएसके सोडणे सर्वांच्या हिताचे असेल यावर त्यांनी सहमती दर्शविली.

## हातात हात घेतला अन् भन्नाट डान्स.. विराट-कुलदीपचा ब्रोमांस

**विशाखापट्टनम :** भारतविरुद्ध दक्षिण आफ्रिका यांच्यात एकदिवसीय सामन्यांची मालिका रंगली. भारताने ही मालिका २-१ ने जिंकली. एसीए-व्हीडीसीए क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात ढशरा खपवळर दक्षिण आफ्रिकेचा ९ विकेट्सने पराभव करून मालिका २-१ अशी जिंकली. यशस्वी जयस्वाल, रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी फलंदाजीत महत्त्वाची भूमिका बजावली. गोलंदाजीत कुलदीप यादव आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी प्रत्येकी चार विकेट्स घेतल्या. सामन्यात तळीरीं घेहश्रळ मजेशीर अंदाज पाहायला मिळाला. विराटचा आणि कुलदीपचा आता एक व्हिडिओ






व्हायरल होत आहे.विराट मैदानावर त्याच्या मजेदार स्वभावासाठी ओळखला जातो. त्याच्या आक्रमकतेसोबतच, आपल्याला विराटचा मैदानावर खेळकर स्वभाव देखील दिसतो, जो तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात दिसून आला. कुलदीप यादवने तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात कॉर्बिन बॉशला बाद केले. त्यानंतर, विराट कोहली त्याच्या जवळ गेला, त्याचा हात धरला आणि नाचू लागला. या डान्सची आता सर्वत्र चर्चा होत आहे. यावरून त्यांतील मैत्री ही किती घट्ट आहे ते समजत आहे.भारताचा चायनामन गोलंदाज कुलदीप यादव हा एकदिवसीय सामन्यात एकाच संघाविरुद्ध सर्वाधिक चार विकेट्स घेणारा भारतीय गोलंदाज बनला आहे. शनिवारी एसीए-व्हीडीसीए क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात भारताने दक्षिण आफ्रिकेला २७० धावांवर रोखले. या डावात भारताचा चायनामन गोलंदाज कुलदीप यादवने १० षटकांत ४१ धावा देत ४ बळी घेतले. या डावात कुलदीप यादव एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक ४ बळी घेणारा तिसरा भारतीय गोलंदाज ठरला. कुलदीपने ११ वेळा ही कामगिरी केली आहे. या यादीत त्याच्या आधी मोहम्मद शमी (१६ वेळा) आणि अजित आगरकर (१२ वेळा) यांचा क्रमांक लागतो.कुलदीप यादवचा दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा हा पाचव्यांदा ४ बळी घेतले, जो एकदिवसीय क्रिकेटमध्ये कोणत्याही संघाविरुद्ध भारतीय गोलंदाजाने सर्वाधिक ४ बळी घेण्याचा विक्रम आहे. झहीर खानने झिम्बाब्वेविरुद्ध चार वेळा आणि मोहम्मद शमीने वेस्ट इंडिजविरुद्ध चार वेळा ही कामगिरी केली आहे.

# पहिला अनब अखेरचा ठरला तो फोटो, जेव्हा धर्मेंद्र यांच्या दोन्ही पत्नी दिसलेल्या सोबत

## सुखात नांदूनही एकमेकींच्या घरात ठेवलं नाही पाऊल



**मुंबई :** बॉलिवूडचे हिमॅन धर्मेंद्र आता आपल्यात नाहीत. पण त्यांच्या आठवणी प्रेक्षकांच्या मनात कायम जाग्या आहेत. धर्मेंद्र यांनी वयाच्या ८९ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. जर ते जीवंत असते तर आज ८ डिसेंबर रोजी त्यांचा ९० वा वाढदिवस जल्लोषात साजरा झाला असता. धर्मेंद्र यांनी इंडस्ट्रीची ६० वर्ष गाजवली. त्यामुळे त्यांचे अनेक किस्से व्हायरल झाले.धर्मेंद्र हे बॉलिवूडमधील अशा अभिनेत्यांपैकी एक होते ज्यांनी दोनदा लग्न केले. मात्र ते त्यांच्या पहिल्या पत्नी आणि मुलांबद्दलच्या जबाबदाऱ्यांबद्दल इतके जागरूक होते की त्यांनी प्रकाश कौर यांना घटस्फोट देण्यास नकार दिला. सोशल मीडियावर एक फोटो समोर आला आहे, कदाचित त्यात हेमा आणि प्रकाश कौर एकत्र दिसत असलेला हा एकमेव फोटो आहे.धर्मेंद्र यांनी १९५४ मध्ये प्रकाश कौर यांच्याशी पहिले लग्न केले होते. त्यावेळी धर्मेंद्र १९ वर्षांचे होते. पहिली पत्नी आणि चार मुले असूनही, ते दुसऱ्यांदा प्रेमात पडले. सिनेमात एकत्र काम करताना ते हेमा मालिनींवर इतके भाळले की त्यांनी १९८० मध्ये त्यांच्याशी दुसरे लग्न केले. पण त्यांनी त्यांची पहिली पत्नी प्रकाश कौरला घटस्फोट दिला नाही.हेमा मालिनी यांनी सांगितले आहे की त्या कधीही त्यांची सवत प्रकाश कौरला भेटल्या नाही किंवा धर्मेंद्रंच्या जुहू येथील बंगल्यात पाऊलही ठेवले नाही. हेमा त्या बंगल्यापासून थोड्याच अंतरावर राहतात. धर्मेंद्रच्या पहिल्या पत्नीशी झालेल्या भेटीबद्दल हेमा मालिनी यांनी सांगितले की त्यांच्या लग्नानंतर, त्या पुन्हा कधीही त्यांना भेटल्या नाहीएकदा असाही प्रसंग आला होता जेव्हा धर्मेंद्रंच्या दोन्ही पत्नी, प्रकाश कौर आणि हेमा मालिनी एकत्र दिसल्या होत्या आणि हा फोटो बॉलिवूडमधील दुर्मिळ फोटोंपैकी एक मानला जातो. या आयकॉनिक फोटोमध्ये धर्मेंद्र त्यांच्या दोन्ही पत्नींसोबत दिसत आहेत. फोटोमध्ये, धरमजी नेहमीप्रमाणेच देखणे दिसत आहेत, सूट आणि बूटामध्ये खूप आकर्षक दिसत आहेत.

# अभिनेत्रीनं केलं मुस्लीम क्रिकेटपटूशी लग्न



**मुंबई :** वयाच्या १३ व्या वर्षी चित्रपट कारकिर्दीला सुरुवात करणाऱ्या शर्मिला यांनी त्यांच्या कारकिर्दीत सुमारे ६०-७० चित्रपटांमध्ये काम केलं आहे. हिंदी व्यतिरिक्त, त्यांनी बंगाली चित्रपटांमध्येही काम केलंय. आंध्र प्रदेशातील एका हिंदू बंगाली कुटुंबात जन्मलेल्या या ज्येष्ठ अभिनेत्रीच्या हिट चित्रपटांमध्ये आराधना, अमर प्रेम, दाग, मौसम, अनुपमा, ॲन इव्हिनिंग इन पॅरिस आणि चुपके चुपके सारखे ब्लॉकबस्टर चित्रपट आहेत. राजेश खन्ना आणि शर्मिला यांचा 'आराधना' हा सिनेमा ५० आठवडे थिएटरमध्ये चालला.शर्मिला यांचा पहिला चित्रपट १९५९ मध्ये आलेला 'अपूर संसार' हा होता. जवळपास पाच वर्षे बंगाली चित्रपटांमध्ये काम केल्यानंतर, शर्मिला यांना बॉलिवूडमध्ये ब्रेक मिळाला. त्यांनी शक्ती सामंतांच्या 'काश्मीर की कली' या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं.१९६६ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'अनुपमा' चित्रपटानं शर्मिला यांना यश मिळवून दिलं. या चित्रपटाने त्यांना बॉलिवूडमध्ये एक आघाडीची अभिनेत्री म्हणून नाव दिलं. त्यानंतर शर्मिला यांनी अनेक सुपरहिट सिनेमे दिले. अमिताभ बच्चन, राजकुमार, राजेश खन्ना आणि शशी कपूर सारख्या सुपरस्टार्ससोबत काम करून त्यांना प्रचंड प्रसिद्धी आणि संपत्ती मिळाली.इंडिया टुडे' ला दिलेल्या मुलाखतीत शर्मिला म्हणालेल्या, 'प्रोफेशन म्हणून, कधीकधी आम्ही पैशासाठी चित्रपट साइन करतो, कधीकधी फक्त भाडं देण्यासाठी. कधीकधी आम्ही एखाद्या सहकाऱ्याला किंवा अशा व्यक्तीला मदत करण्यासाठी चित्रपट साइन करतो जो असा विश्वास ठेवतो की मी जर चित्रपटाचा भाग असेल तर तो चांगला चालेल.'शर्मिला टागोर यांनी भारतीय संघाचे कर्णधार नवाब पटौदी यांच्यासोबत लग्न केलं. या लग्नासाठी त्यांनी इस्लाम धर्म स्वीकारला. त्यानंतर शर्मिला यांनी स्वतःचं नाव आयेशा सुलतान ठेवलं. मीडिया रिपोर्ट्सनुसार, नवाब पतौडी यांच्या मृत्युनंतर, शर्मिला टागोर जवळपास २,७०० कोटी (२७ अब्ज रुपये) किमतीच्या मालमत्तेच्या मालक आहेत. यामध्ये असंख्य आलिशान वाड्यांचा समावेश आहे, ज्यांची किंमत कोट्यवधींमध्ये आहे.

# 'आम्हाला किंमत द्यायला पाहिजे', डीपी दादाचा सूरज चव्हाणवर संताप



**मुंबई :** बिग बॉस मराठीच्या पाचव्या पर्वाचा विजेता सूरज चव्हाणनं २९ नोव्हेंबर २०२५ रोजी लग्नगाठ बांधली. सूरजच्या लग्नाला जान्हवी किल्लेकरही उपस्थित होती. मोठ्या थाटामाटात सूरजचं लग्न झालं. अशातच आता बिग बॉस मराठी फेम धनंजय पोवार म्हणजेच डीपी दादाने सोशल मीडियावर व्हिडिओ शेअर केलाय. हा व्हिडिओ शेअर करत धनंजयनं सूरजवर नाराजी व्यक्त केली आहे.सूरजचं घर अजित पवार यांनी बांधून दिलं. मात्र, त्या घरात सोफासेट मी देणार असं धनंजय पोवारने सूरजला सांगितलेलं. मात्र, सूरजने डीपीच्या फोनवर काहीच प्रतिसाद दिला नाही. यासंदर्भात डीपी दादांनं व्हिडिओ शेअर केलाय. व्हिडिओमध्ये धनंजय पोवार म्हणतोय की, 'आजचा विषय, सूरजच्या फर्निचरचा आहे. सूरजला मी सांगितलेलं की, तुझ्या घरात सोफासेट असेल तो मी देणार. सोसायटी फर्निचर देणार. दीड महिन्याआगोदर त्याचा मला फोन आलेला, सोफासेटचं काय करणार? मी त्याला म्हटलं, मी सोफासेट पाठवतोय. तू इकडे येणार आहेस का? तुला कोणता हवा आहे? त्यानंतर मी त्याच्याकडे पत्ता मागितला. त्याच्या लग्नाच्या आदल्या दिवसापर्यंत त्याने मला सांगितलं नव्हतं की, मी बाहेरून फर्निचर घेतलंय. मला काहीच माहित नाही. मी पुण्याच्या पार्टीला सांगून सोफा तयार करून घेतलेला. आणि आज लोकं कमेंट करतायत मतासाठी ह्यांनी असं केलं.'आज आम्ही जे काही आहोत, ते स्वतःच्या हिंमतीवर आहोत. त्याला म्हटलं मी देणार होतो तुला. तो म्हणाला, 'मला दादा देणार आहेत' आणि ह्याचा जाब सूरजला विचारा ना! मी आजही सोफासेट त्याला द्यायला तयार आहे. माझं त्याच्या भावासोबतही बोलणं झालेलं. कमेंट करताना विचार करायचा. त्याला जर माझ्याकडून नको असेल, त्याला मी काय करू? त्याने पण आम्हाला किंमत द्यायला पाहिजे. त्याने स्वतःहून सांगायला पाहिजे. मला का विचारताय तुम्ही? त्याने मला सांगितलं नाही. लग्नाच्या दिवसापर्यंत त्याने मला लोकेशन, पत्ता काहीच पाठवलं नाही. आणि आमचं आम्ही बघून घेऊ, तुम्हाला कशाला कमेंट करायच्या आहेत?' असं धनंजयनं पुढे म्हटलंय.धनंजयने हा व्हिडिओ शेअर करत कॅप्शनमध्ये लिहिलंय की, 'त्याला बाहेरून सोफा मिळाला त्याने घेतला...पण त्याने मला ही कॉल केला होता कसं करूया म्हणून... पण त्याने बाहेर जर सांगितलं होतं, तर ते त्याने मला कळवलं पाहिजे होतं..तरी ही त्याने मला लोकेशन पाठवायला पण वेळ लावला (आदल्या रात्री पाठवलं ) जणू आधी मी त्याला हे पण बोललो.

# ही ट्रिक वापरून वाजपेयी करतायत वेटलॉस



**मुंबई :** मनोरंजन क्षेत्रात काम करणाऱ्या कलाकारांसाठी फिट राहणं हा त्यांच्या दैनंदिन आयुष्याचा एक महत्त्वाचा भाग असतो. पण काही कलाकार यासाठी जिममध्ये तासनतास घालवत नाहीत, तर साध्या शिस्तीतल्या सवयी अंगीकारतात. वाढतं वय, व्यस्त शूटिंग शेड्युल आणि ताणतणाव यामुळे शरीरावर परिणाम होणं सहज शक्य असतं. तरी काही जण आपल्या दिनचर्येत लहान बदल करून आयुष्यभर तंदुरुस्ती जपून ठेवतात. आपल्या सर्वांच्याच आवडत्या अभिनेत्यांपैकी एक असलेले मनोज वाजपेयी यांचं नाव त्यात अग्रेसर आहे.त्यांच्या दिसण्यात अजूनही तरुणाईचे तेज दिसते. आश्चर्य वाटेल पण ते कोणतेही भारी-भरक्या फिटनेस ट्रिक्स वापरत नाहीत. केवळ एक नियम पाळून ते स्वतःला इतकं फिट ठेवतात. आणि हा नियम त्यांनी कुणाकडून घेतला आहे, हे जाणून घेतलं तर तुम्हालाही तो पाळायची इच्छा होईल. चला मग जाणून घेऊया त्यांच्या तंदुरुस्तीचा हा अनोखा मंत्र नक्की काय आहे.मनोज वाजपेयी रात्रीचे जेवण करत नाहीत. सुमारे १४ वर्षांपासून त्यांनी हा नियम पाळायला सुरुवात केली आणि तो आजतागायत अखंड सुरू आहे. पचनसंस्था रात्री अधिक हळू काम करते, त्यामुळे उशिरा खाल्लेले अन्न शरीरात थांबून राहते असे अनेक संशोधनात नमूद आहे. रात्री जेवण टाळल्याने झोप हलकी होत नाही आणि शरीराला विश्रांतीसाठी अधिक वेळ मिळतो. त्यामुळे सकाळी उठल्यावर आळस वाटत नाही. मनोज यांचं म्हणणं आहे की, या बदलाने त्यांच्या वजनावर आणि ऊर्जा पातळीवर मोठा फरक पडला.सध्या ते दिवसभरात फक्त एकदाच पोटभर जेवतात आणि त्यानंतर साधारण १२ ते १४ तासांचा उपवास करतात. ही संकल्पना आंतरायिक उपवास म्हणून ओळखली जाते. या पद्धतीने शरीरातील चरबी कमी प्रमाणात साठते आणि आतड्यांवरचा ताण कमी होतो. उपवासाचा कालावधी शरीरातील विषारी घटक बाहेर टाकायला मदत करतो. तसेच इन्सुलिन संवेदनशीलता सुधारते आणि साखर व मेटाबॉलिझम नियंत्रणात राहतो.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# स्किल एक्यूपंक्चर कॉलेज व हॉस्पिटल बुलढाणा आणि स्किल पॅरामेडिकल कॉलेज बुलढाणा येथे महापरिनिर्वाण दिन साजरा....

**जनसंचलन/बुलढाणा**

दिनांक ६ डिसेंबर २०२५ रोजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर सचिन सुपे सर यांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेस अभिवादन व स्मृति पूजन केले यावेळी स्किल अबॅकस कंपनीच्या डायरेक्टर डॉक्टर छाया कंकाळ जीवणे, प्राध्यापक संजय सोनोने, प्राध्यापक उमेश साळवे, प्राध्यापिका प्रतिभा जाधव, प्राध्यापिका प्रियंका साळवे, श्री गजानन कंकाळ, प्राध्यापक शुभम सुरडकर, प्राध्या. कोमल लटके,श्री दिगंबर खंडागळे, मेघा मॅडम, भूषण बैरागी, शिल्पा जाधव , लक्ष्मी ढोके आणि विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित राहून महामानवाला आदरांजली अर्पण केली. आपल्या भाषणामध्ये डॉक्टर सचिन सुपे सर यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी समता आणि बंधुता यांची त्यांनी दिलेली मूल्ये आजही तितकीच महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले, विद्यार्थ्यांनी या दिवशी पुस्तके घेऊन अभ्यास केला असता तर खऱ्या अर्थाने बाबासाहेबांना श्रद्धांजली अर्पण झाली असती हे मोलाचे विचार डॉक्टर सुपे सर यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडले. तसेच आपल्या भाषणामध्ये डॉक्टर छाया कंकाळ जीवने यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्याचा आढावा घेतला तसेच त्यांनी संविधान निर्मितीतील आंबेडकरांचे मोलाचे योगदान, सामाजिक न्यायाची त्यांची भूमिका हे विचार त्यांनी मांडले. प्राध्यापक साळवे सर यांनी आपल्या भाषणातून वाचाल तर वाचाल या उक्तीप्रमाणे विद्यार्थ्यांनी वागावे, समाजातील दुर्बल व आणि वंचित शोषित घटकांना उभारी देण्याचे बाबासाहेबांचे कार्य आपल्या पिढीसाठी दीपस्तंभ आहे तसेच



बाबासाहेबांनी आपल्याला दिलेले सर्वात मोठी देणगी म्हणजे भारतीय संविधान समानता, स्वातंत्र्य,बंधुता आणि न्याय यांचा पाया त्यांनी घातला. समाजातील शेवटच्या माणसापर्यंत हक्क पोहोचवण्याची ताकद त्यांच्या विचारात होती. प्राध्यापक साळवे सरांनी त्यांच्या भाषणात त्यांनी सांगितले की संविधान हे प्रत्येक विद्यार्थ्यांनी वाचले पाहिजे म्हणजेच बाबासाहेबांना खऱ्या अर्थाने महामानवाला महापरिनिर्वाणदिनी अभिवादन स्वीकारले जाईल. तसेच विद्यार्थ्यांनी सुद्धा आपल्या भाषणातून बाबासाहेबांच्या आठवणीवर उजाळा दिला. बाबासाहेबांचे विचार... शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा हे विचार आजच्या पिढीसाठी आवश्यक आहेत, शिक्षणाशिवाय प्रगती अशक्य आहे हेच विचार विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून प्रकर्षाने मांडले. आजच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन प्राध्यापिका प्रियंका साळवे यांनी केले.

# सराफा दुकानात चोरी

**जनसंचलन/ पिंपळगाव राजा**



शहरातील मुख्य रस्त्यावर असलेल्या सराफा दुकानामध्ये ७ डिसेंबर रोजी दुपारच्या सुमारास भरदिवसा चोरीची धक्कादायक घटना घडली. या घटनेत अंदाजे ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे पेंडंट लंपास केल्याचे समोर आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दुपारच्या वेळी एक युवक दुचाकीने शुभम ज्वेलर्सच्या दुकानासमोर आला. दुचाकी उभी करून तो दुकानात शिरला आणि दुकानदाराकडे सोन्याच्या अंगठ्या दाखविण्याची मागणी केली. दुकानदार अंगठ्या दाखवत असतानाच त्याने संधी साधून ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे पेंडंट उचलले आणि दुकानाबाहेर पळ काढला. हा प्रकार लक्षात येताच दुकानदाराने आरडाओरडा केला; मात्र तोपर्यंत संबंधित युवक फरार झाला होता. घटनेचीमाहितीमिळताचपिंपळगावराजा पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक भागवत मुळीक यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी दुकानातील, तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करून पंचनामा केला. चोरट्यांच्या शोधासाठी स्वतंत्र पोलिस पथक स्थापन करण्यात आले असून, मुख्य रस्त्यावर व परिसरातील महत्त्वाच्या ठिकाणी नाकाबंदी करून कसून तपास सुरू आहे. याप्रकरणी दुकानाचे मालक रमेश अनासणे यांनी पिंपळगाव राजा पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# ३० किलोमीटर सायकलिंग स्पर्धेत हर्ष गाढे प्रथम

**जनसंचलन/बुलढाणा**



बुलढाणा सायकलिंग क्लबतर्फे आयोजित ३० किलोमीटर सायकलिंग स्पर्धेत भारत विद्यालयात इयत्ता नववीमध्ये शिक्षण घेत असलेला हर्ष गाढे याने प्रथम क्रमांक पटकाविला. जिल्हा पोलीस अधीक्षक नीलेश तांबे यांच्याहस्ते ५ डिसेंबर रोजी हर्षला पारितोषिक प्रदान करण्यात आले. स्पर्धेची सुरूवात शनिवारी सकाळी ६:३० वाजेच्या सुमारास जिजामाता क्रीडा संकुल येथून करण्यात आली. यानंतर, संगम चौक, धाड नाका, कोलवड, हातडी, चिखला या मार्गाने निघत परत जिजामाता क्रीडा संकुल येथे समारोप करण्यात आला. यानंतर, बक्षिक समारंभ पार पडला. यामध्ये, पुरुष व महिला गटातील पहिल्या तीन विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात आले. हर्षल गाढे याने प्रथक क्रमांक पटकाविल्याने जिल्हा पोलीस अधीक्षक नीलेश तांबे यांच्याहस्ते त्याला पारितोषिक देण्यात आले. बुलढाणा सायकलिंग क्लबतर्फे घेण्यात आलेली ही स्पर्धा उत्साहात पार पडली.

# राष्ट्रीय खाद्य तेल अभियानांतर्गत जिल्ह्यात तिळाचे 100% अनुदानावर बियाणे वितरण

**जनसंचलन/बुलढाणा**



देशातील खाद्यतेल आयात कमी करून स्वावलंबन साध्य करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय खाद्य तेल अभियानांतर्गत तेलबिया गळीतधान्य कार्यक्रम अंतर्गत उन्हाळी हंगाम २०२५२६ करिता तिळाचे प्रमाणित बियाणे १००% अनुदानावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. केंद्र शासनामार्फत बुलढाणा जिल्ह्यासाठी हे बियाणे वाटप करण्यात येणार असून शेतकऱ्यांना तिळाचे उत्पादन वाढविण्यासाठी मोठी संधी उपलब्ध झाली आहे. शेतकऱ्यांनी बियाण्यांसाठी ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे. देशातील तेलबिया उत्पादनात वाढ करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे तसेच सुधारित वाणांचा प्रसार करणे हा या अभियानाचा उद्देश आहे. यानुसार तिळासाठी हेक्टरी २.५ किलो (रु. १९७ प्रति किलो) प्रमाणित बियाणे वितरीत केले जाणार आहे. या योजनेत प्रति लाभार्थी किमान ०.२० हेक्टर ते कमाल १ हेक्टर क्षेत्रासाठी अनुदान मंजूर करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना पॅकिंग साईजप्रमाणेच बियाणे देण्यात येणार असून पॅकिंग साईजमुळे क्षेत्रापेक्षा अधिक बियाणे मिळाल्यास त्या अतिरिक्त बियाण्याची रक्कम लाभार्थ्यांना स्वतः भरावी लागेल. ऑनलाइन अर्ज करण्यासाठी शेतकऱ्यांना ॲग्रीस्टॅक योजनेंतर्गत नोंदणी अनिवार्य आहे. अर्ज प्रक्रिया ://... या संकेतस्थळावरील कृषी विभागातील प्रमाणित बियाणे वितरण, पिक प्रात्यक्षिके, खते-औषधे या टाईलद्वारे करता येईल. लाभार्थी निवड प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर होणार आहे. बुलढाणा जिल्ह्यातील सर्व इच्छुक शेतकऱ्यांनी लवकरात लवकर अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी नजीकच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयात संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.



# जिल्हाधिकारी कार्यालयात संत संताजी जणगाडे महाराज यांची जयंती...



**जनसंचलन/बुलडाणा**

संत संताजी जणगाडे महाराज यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी किरण पाटील यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे, तहसीलदार विजय सवडे, वृषाली केसकर, जिल्हा नाझर गजानन मोतेकर, ॲड. किशोर गायकवाड, तुषार काचकुरे, प्रशांत भोरसे, रविराज राठोड, श्रीकांत झापर्डे, निलेश मिसाळ यांचेसह बुलढाणा येथील समाजबांधव प्रातिनिधिक स्वरूपात उपस्थित होते.

# केंब्रिजच्या विद्यार्थ्यांची विज्ञान मंथन परीक्षेत चमकदार कामगिरी

**जनसंचलन/बुलढाणा**

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद आणि विज्ञान भारती यांच्या वतीने आयोजित विद्यार्थी विज्ञान मंथन परीक्षा २०२५-२६ मध्ये येथील केंब्रिज विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले. ही परीक्षा ऑनलाइन पद्धतीने २८ ते ३० ऑक्टोबरदरम्यान घेण्यात आली होती. या परीक्षेसाठी केंब्रिज विद्यालयातील एकूण ४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यांपैकी २२ विद्यार्थ्यांनी लेव्हल-१ परीक्षा उत्तीर्ण केली, तर २ विद्यार्थी राज्य कॅम्पसाठी पात्र ठरले. यानंतर लेव्हल-२ परीक्षा १९ ते ३० नोव्हेंबरदरम्यान पार पडली. या टप्प्यात २२ विद्यार्थी पात्र झाले, तर २ विद्यार्थ्यांनी राज्यस्तर (लेव्हल-३) कॅम्पमध्ये स्थान मिळवत शाळेचा मान वाढवला. या विद्यार्थ्यांना शाळेतील विज्ञान विषयशिक्षिका विद्या पवार यांचे मार्गदर्शन लाभले. शाळेचे प्राचार्य मुकेश



परीक्षेतील यशस्वी विद्यार्थी. जगताप व पी. आर. ओ. श्री. चंद्रहास पिसे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच शाळेचे संस्थापक धीरज लिंगाडे व शैक्षणिक मार्गदर्शिका पद्मजा लिंगाडे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. राज्यस्तरासाठी साई स्वप्निल काटे (इयत्ता ६वा), सार्थक भागवत पाटील (इयत्ता ७वी) हे विद्यार्थी पात्र झाले आहेत. या विद्यार्थ्यांचा केंब्रिजचे प्राचार्य जगताप यांनी सत्कार केला. त्यांना या परीक्षेसाठी मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

# सशस्त्र सेना ध्वज दिन निधी संकलनाचा उत्साहात शुभारंभ

**जनसंचलन/बुलढाणा**

सशस्त्र सेना ध्वज दिन निधी संकलनाचा शुभारंभ सैनिकी सभामंडप, बुलढाणा येथे रविवार, ७ डिसेंबर रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी भूषविले. यावेळी जिल्हा पुनर्वसन अधिकारी सदाशिव शेलार, राज्य उत्पादन शुल्कचे विभागीय उप आयुक्त डॉ.पराग नवलकर, बुलढाणा अर्बन बँकेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्यामजी चांडक, तसेच स्कॉड्रन लीडर डॉ. रुपाली गणेश मानमोडे, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी उपस्थित होते. यावेळी ध्वजारोहण करून ध्वज दिन निधी संकलनाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी सांगितले की, माजी सैनिकांनी पोलिस भरतीतील आरक्षणाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. सीमेवर सैनिक पहारा देतात म्हणूनच पोलीस दल आंतरिक सुरक्षा सक्षमपणे सांभाळू शकते,फ्र असे त्यांनी नमूद केले. तसेच जिल्हा पोलीस दल राष्ट्रीय कार्यासाठी नेहमी तत्पर राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. राधेश्यामजी चांडक यांनी बुलढाणा जिल्ह्यातील ध्वज दिन निधी संकलन २ कोटींपेक्षा जास्त करण्याचा निर्धार व्यक्त केला. तर जिल्हा पुनर्वसन अधिकारी सदाशिव शेलार यांनी सर्व विभागांनी एकत्रित येऊन या राष्ट्रीय कार्यात हातभार लावण्याचे आवाहन केले. ध्वज दिन निधी मागील देशभक्तीपर भावना नागरिकांनी समजून घेणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. ध्वज दिनाचे महत्त्व ७ डिसेंबर हा दिवस देशभर ध्वज दिन म्हणून पाळण्यात येतो. ७ डिसेंबरपासून ते पुढील वर्षाच्या नोव्हेंबर अखेरपर्यंत निधी संकलन केले जाते. या निधीचा उपयोग शहीद जवानांच्या कुटुंबियांच्या सहाय्यासाठी, युद्धातील अपंग सैनिकांच्या पुनर्वसनासाठी व निवृत्त सैनिकांच्या कल्याणकारी योजनांसाठी केला जातो. बुलढाणा जिल्ह्याची उल्लेखनीय कामगिरी मागील वर्षी बुलढाणा जिल्ह्याला ₹५९,५०,००० इतका इष्टांक देण्यात आला होता; मात्र जिल्ह्यातील नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे ₹६६,३५,००० (१११.५१%) इतके भरीव संकलन करण्यात आले. यंदाही बुलढाणा जिल्हा अधिक मोठ्या प्रमाणावर निधी संकलन करण्यास सज्ज झाला आहे. सशस्त्र सेना ध्वज दिनाच्या औचित्याने देशरक्षकांच्या कार्याचा सन्मान करत जिल्ह्यातील विविध विभाग व नागरिकांनी या राष्ट्रीय उपक्रमात सक्रियपणे सहभागी व्हावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणूक रक्कम / गुंतवणूक कालावधी महिने | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३१९९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | – |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | – |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा...

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे

सुकन्या लक्षाधीश ठेव योजना

जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली

मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा

फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४



